| MHOS0900259623014 | प्राप्त दिनांक | : | ०९/१२/२०१४ |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | ०९/१२/२०१४ |
| | निकाल दिनांक | : | ०३/०७/२०२६ |
| | कालावधी | : | व. म. दि.<br>११ ०६ २४ |

**भाग-अ**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कळंब (न्यायालय क्र.२) यांचे न्यायालयात**

**( पिठासीन अधिकारी श्री. एन.एम. रेड्डी )**

**नियमित फौजदारी खटला नं.२७५/२०१४.** **निशाणी नं.**

.................................................................................................

गु.र.क्रमांक ८९/२०१४, पो.स्टे. कळंब, भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे.

.................................................................................................

**महाराष्ट्र सरकार,**
पोलीस ठाणे कळंब,

**...अभियोग पक्ष**

**अभियोग पक्षातर्फे सहा. शासकीय अभियोक्ता श्री. अयाजोद्दीन रियाजोद्दीन**

**विरुध्द**

**फिरोज पाशा बागवान,**
वय २५ वर्षे, व्यवसाय – मजुरी
रा.बायपास रोड, कळंब,
ता.कळंब, जि.उस्मानाबाद. **...आरोपी**

**आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. बी.बी. कोळपे.**

**भाग-ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेला दिनांक | १५/०९/२०१४ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | १५/०९/२०१४ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ०९/१२/२०१४ |
| आरोपींवर दोष ठेवल्याची तारिख | ०४/०३/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०७/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव दिनांक | ----- |
| न्यायनिर्णय दिनांक | ०३/०७/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, दिली असेल तर | ----- |

## आरोपीचा तपशिल

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनवर सोडल्याचा दिनांक | दोषारोप | शिक्षा दिली अथवा मुक्त केले, | काय शिक्षा दिली | फौ.प्र.सं.कलम ४२८ प्रमाणे आरोपीचा कारागृहातील वजावट होण्यास पात्र आहे काय ? |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | फिरोज पाशा बागवान, | १५/०९/१४ | २६/०९/१४ | भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे. | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |

## भाग-क

## अभियोगपक्षातर्फे नोंदविणेत आलेले साक्षीदारांची यादी.

| अ.क्रं. | नाव | पुराव्याचे स्वरूप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | इरफान ताहेर सय्यद | जप्ती पंच | ४४ |
| २ | मिर्झा वहाब मन्सब बेग | फिर्यादी | ४८ |
| ३ | मधुकर रेवणसिध्द जाधव | साक्षीदार | ५३ |
| ४ | आर.पी. नाईकवाडी | तपासीक अंमलदार | ५४ |

**निशाणी यादी.**

| अनु.क्रं. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १ | ४५ | पंचनाम्यास ओळखीपुरते |
| २ | ४९ | फिर्याद |
| ३ | ५० | छापील प्रथम खबर अहवाल |

**भौतिक वस्तू/मुद्देमाल.**

| अनु.क्रं. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १ | ५७/२२ | एक ४३ से.मी. लांब व १० से.मी. मुठ आणि एका बाजुस धारदार पाते असलेली एक लोखंडी तलवार. |

## न्यायनिर्णय

**(दिनांक ०३/०७/२०२६ रोजी जाहीर )**

अभियोग पक्षातर्फे दाखल करण्यात आलेला प्रस्तुतचा खटला आरोपींविरुध्द भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ नुसारच्या गुन्ह्यासाठी चालला आहे.

**<u>अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे -</u>**

२. फिर्यादी मिर्झा वहाब मन्सब बेग (येथुन पुढे "फिर्यादी" असे संबोधले आहे) यांनी दिनांक १५/०९/२०१४ रोजी ते व ए.एस.आय. नाईकवाडी, पो.ना./१३६४ शिंदे आणि पो.कॉ. जाधव असे जीपने ०९.०५ वाजता पब्लीक एन.सी. क्र.२९३/२०१४ मधील फिरोज पिता पाशा बागवान याचा शोध घेण्यासाठी रवाना झाले. शहरात पेट्रोलिंग करत असताना आरोपी हा आठवडी बाजारात हातात तलवार घेऊन फिरत आहे व ताहेर मोमीन यास खतम करतो अशी धमकी देत आहे. त्यानंतर सदर ठिकाणी जाऊन पाहणी केली असता, आरोपी हा त्यांना पाहुन नजर चुकवुन निघाला. त्यावेळी सोबतच्या लोकांना सांगुन त्यास ०९४५ वाजता ताब्यात घेतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्या शर्टच्या आत एक तलवार दस्ती गुंडाळलेली मिळुन आली. ती पंचांसमक्ष जप्त करुन त्यास ताब्यात घेतले. तसेच, तलवार बाळगण्याच्या परवाण्याबाबत विचारणा केली असता तो काहीही सांगत नव्हता. म्हणुन त्याच्याविरुध्द फिर्याद दाखल केली.

३. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने कळंब पोलीस स्टेशन येथे गु.र. क्रं. ८९/२०१४ भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. प्रस्तुत प्रकरणाचा तपास सहा. पोलीस उपनिरीक्षक श्री. नाईकवाडी (येथून पुढे तपासीक अंमलदार म्हणून संबोधले आहे) यांचेकडे सोपविण्यात आला.

४. तपासी अधिकारी यांनी तपासाअंती दोषारोप न्यायालयात दाखल केल्यानंतर माझे विद्वान पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे निशाणी ३७ अन्वये दोषारोप ठेवले. अभियोग पक्षातर्फे प्रस्तुत प्रकरणात आरोपींविरूध्द ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द करण्याकरीता चार साक्षीदारांची साक्ष नोंदविणेत आली. त्यानंतर अभियोग पक्षाचा पुरावा निशाणी क्रं. १ वरील दिनांक ०७/०५/२०२६ रोजीच्या आदेशान्वये बंद करणेत आला. तसेच, निशाणी ५५ प्रमाणे आरोपीचे फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ३१३ प्रमाणे आरोपींचे निवेदन नोंदविण्यात आले.

५. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख वाचला. प्रस्तुत प्रकरणातील मुद्दे व त्यावरील निष्कर्ष मी, कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नमूद केले आहेत.

| अ.क्र. | प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | उपरोक्त दिनांक, ठिकाणी आणि वेळी आरोपीने त्याच्याकडे कोणताही वैध परावाना नसताना स्वत:जवळ तलवार बाळगली व त्यायोगे भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वये गुन्हा केला आहे असे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**:: कारणमिमांसा ::**

**प्रश्न क्र.१ बाबतः**

६. अभियोग पक्षातर्फे आरोपींविरुध्दचे दोषारोप सिध्द करण्यांकरीता चार साक्षीदारांची साक्ष नोंदविणेत आली.

७. सा.क्र.१ इरफान हे सदरच्या प्रकरणातील पंच आहेत. परंतु, त्यांनी अभियोग पक्षास उपयुक्त अशी साक्ष न दिल्यामुळे त्यांना अभियोग पक्षाने उत्तरसुचक प्रश्न न्यायालयाच्या परवानगीने विचारले. तरीदेखील त्यांनी सर्व उत्तरसुचक प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिले.

८. साक्षीदार क्र.२ मिर्झा हे सदरच्या प्रकरणातील फिर्यादी आहेत. त्यांनी असे कथन केले आहे की, दिनांक १५/०९/२०१४ रोजी ते पोलीस स्टेशन, कळंब येथे सहा. पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत होते. पेट्रोलिंग करत असताना, आठवडी बाजारात आरोपी हा ताहेर मोमीन यांना खतम करतो म्हणुन आरडाओरडा व शिवीगाळ करत आहे अशी माहीती मिळाली. त्यानंतर ते तेथे गेले तो त्यांना पाहुन पळुन जात होता. त्यांच्या सोबतच्या कर्मचा-यांनी त्यांना पकडले. त्यांनी त्याची अंगझडती घेतली असता, त्याच्या शर्टच्या पाठीमागे एक तलवार मिळुन आली. सदरची तलवार त्यांनी दोन पंचांसमक्ष पंचनामा करुन जप्त केली. त्यांनी अभिलेखावरील निशाणी ४५ वरील जप्ती पंचनामा पाहुन त्यावर त्यांची व पंचांची आणि आरोपीची सही आहे तसेच, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे, असे कथन केले आहे. तसेच, निशाणी ४९ आणि ५० वर त्यांची सही असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे कथन केले आहे. त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान आरोपीकडुन जप्त केलेली तलवार वस्तु अ जी.एम.आर.क्र.५७/२०२२ ओळखली.

९. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले आहे की, ते पेट्रोलिंग करण्याकरीता गेलेल्या गाडीचा क्रमांक त्यांना आठवत नाही. पेट्रोलिंग करण्याकरीता जाण्यापुर्वी स्टेशन डायरीला नोंद केल्याचे त्यांना आठवत नाही. तसेच, आठवडी बाजारात खुप गर्दी असते. इतर प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारार्थी दिलेली आहेत.

१०. साक्षीदार क्र.३ मधुकर यांनी असे कथन केले आहे की, सन २०१४ मध्ये ते पोलीस स्टेशन, कळंब येथे कार्यरत होते. दिनांक १५/०९/२०१४ रोजी ते, पी.आय. निकते, नाईकवाडी, १३६४/शिंदे असे शासकीय वाहन क्रमांक एम.एच.-२५/सी.-६५९० ने आरोपीचा शोध घेण्याकरीता निघाले होतो. ९.४५ वाजता ते तेथे गेलो असता, आरोपी मिळुन आला त्यावेळी त्यांनी त्याला ताब्यात घेतले असता त्यांनी त्याची अंगझडती घेतली त्यावेळी त्याच्या शर्टच्या पाठीमागील बाजुस एक तलवार व दस्ती गुंडाळलेली मिळुन आली. त्यानंतर त्याला विचारणा केली असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान जप्त केलेली तलवार ओळखली. तपासीक अंमलदार यांनी त्यांच्याकडे चौकशी करुन तपास टिपण नोंदविले होते.

११. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले आहे की, ते चार जण गेले होते. त्यांनी स्टेशन डायरीला नोंद घेतली होती. त्यामध्ये त्यांचे नाव असल्याचे त्यांना सांगता येणार नाही. आठवडी बाजारात भरपुर गर्दी असते. ते आरोपीस ओळखतात. इतर प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारार्थी दिलेली आहे.

१२. साक्षीदार क्र.४ नाईकवाडी यांनी असे कथन केले आहे की, सन २०१४ मध्ये ते पोलीस स्टेशन, कळंब येथे ए.एस.आय. म्हणुन कार्यरत होते. गु.र.क्र.८९/२०१४ या प्रकरणाचा तपास त्यांनी केला आहे. तपासावेळी त्यांच्याकडे घटनास्थळ पंचनामा, अटक पंचनामा व फिर्याद देण्यात आली होती. तपासादरम्यान त्यांनी अटकेची नोंद घेतली. त्यानंतर साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले. त्यानंतर, आरोपीस न्यायालयात हजर केले. आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळुन आल्याने मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले. त्यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यान जप्त केलेली तलवार ओळखली.

१३. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले आहे की, त्यांच्याकडे तपास येण्यापुर्वीच पंचनामा केला होता. त्यांनी पंचनामा केला नसल्यामुळे त्यांना पंचनाम्यातील पंचांची नावे माहीती नाहीत. स्टेशन डायरीला त्यांची नोंद केल्याचे त्यांना माहीती नाही. त्यांनी साक्षीदारांचे आधारकार्ड घेतले नव्हते, ते सर्व पोलीस खात्याचे होते. पोलीस खात्यातील साक्षीदारांव्यतिरक्त इतर साक्षीदारांचे तपास टिपण त्यांनी नोंदविलेले नाही. इतर प्रश्नांची उत्तरे त्यांनी नकारार्थी दिलेली आहेत.

१४. साक्षीदार क्र.२ हे सदरच्या प्रकरणातील फिर्यादी आहेत. तसेच, त्यांच्या कथनाप्रमाणे त्यांनी निशाणी ४५ वरील जप्ती व घटनास्थळ पंचनामा साक्षीदार क्र.१ इरफान

यांच्यासमक्ष केला. अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी विधीज्ञ यांनी युक्तीवाद केला की, अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांच्यामार्फत निशाणी ४५ वरील जप्ती व घटनास्थळ पंचनामा हा सिध्द करण्यात आला आहे. याउलटत आरोपीतर्फे युक्तीवाद करण्यात आला की, आरोपीच्या ताब्यातुन कोणतीही तलवार जप्त करण्यात आलेली नाही. साक्षीदार क्र.१ हे स्वतंत्र साक्षीदार असुन त्यांनी अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा दिलेला नाही.

१५. साक्षीदार क्र.१ यांनी असे कथन केले आहे की, त्यांच्यासमक्ष कोणताही पंचनामा किंवा जप्ती झाली नाही. परंतु, याउलट साक्षीदार क्र.२ यांनी असे कथन केले आहे की, आरोपीची अंगझडती घेतली असता त्याच्या शर्टच्या पाठीमागे तलवार मिळुन आली व त्यानंतर दोन पंचांसमक्ष निशाणी ४५ वरील पंचनामा त्यांनी केला. स्थापीत कायद्याच्या तत्वानुसार जरी जप्ती पंच अभियोग पक्षास समर्थन दर्शवीत नसतील अशा परिस्थीतमध्ये तपासी अधिकारी जप्ती किंवा घटनास्थळ पंचनामा सिध्द करु शकतात. सदरच्या प्रकरणामध्ये साक्षीदार क्र.२ हे फिर्यादी तसेच, तपास वर्ग करण्यापुर्वीचे तपासी अधिकारी आहेत. साक्षीदार क्र.१ यांनी अभियोग पक्षास समर्थन दर्शविले नसल्यामुळे साक्षीदार क्र.२ यांच्या साक्षीवर पुर्णपणे विश्वास ठेवण्यापुर्वी इतर साक्षीदारांची साक्ष तपासणे आवश्यक ठरेल.

१६. साक्षीदार क्र.३ मधुकर यांनी देखील साक्षीदार क्र.२ यांच्या साक्षीप्रमाणे साक्ष दिली आहे. त्यामुळे, साक्षीदार क्र.३ यांची साक्ष साक्षीदार क्र.२ यांच्या साक्षीशी पुरक आहे. तसेच, साक्षीदार क्र.४ हे सदरच्या प्रकरणातील तपासी अधिकारी आहेत. त्यांनी सदरच्या प्रकरणात केवळ दोषारोपपत्र सादर केल्याचे दिसुन येते. त्यामुळे त्यांची साक्ष ही औपचारीक स्वरुपाची असल्याचे दिसुन येते.

१७. बचाव पक्षातर्फे युक्तीवाद करण्यात आला की, अभियोग पक्षाने सदरच्या प्रकरणात कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासलेला नाही. त्यामुळे सरकारी साक्षीदारांवरती पुर्णपणे विश्वास ठेवता येणार नाही. याठिकाणी असे नमुद करणे आवश्यक वाटते की, साक्षीदार क्र.२, ३ व ४ हे पोलीस कर्मचारी आहेत. सदरच्या प्रकरणात जप्ती व घटनास्थळ सिध्द करण्याकरीता साक्षीदार क्र.१ यांची साक्ष महत्वाची ठरते, कारण ते सदरच्या प्रकरणातील एकमेव स्वतंत्र साक्षीदार आहेत. परंतु, त्यांनी अभियोग पक्षास समर्थन दर्शविलेले नाही. त्यामुळे, साक्षीदार क्र.२ यांच्या साक्षीवर विसंबुन राहुन अभियोग पक्षाने सदरच्या प्रकरणातील जप्ती पंचनामा व घटनास्थळ पंचनामा हा संशयापलीकडे सिध्द केला असे म्हणता येणार नाही. निशाणी ३७ वरील दोषारोप सिध्द करण्याकरीता प्रकरणातील तलवार ही आरोपीच्याच ताब्यातुन

घटनास्थळावरुन जप्त झाली हे सिध्द करणे आवश्यक आहे. साक्षीदार क्र.२ यांनी उलटतपासादरम्यान मान्य केले आहे की, घटनास्थळ हे आठवडी बाजाराचे ठिकाण असल्यामुळे तेथे खुप गर्दी असते. असे असताना अभियोग पक्षाने स्वतंत्र साक्षीदार का तपासला नाही याचे कोणतेही स्पष्टीकरण अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेले नाही. अशा परिस्थीतीमध्ये निशाणी ३७ वरील दोषारोप हे अभियोग पक्षाने संशयापलीकडे जाऊन सिध्द केले असे म्हणता येणार नाही. त्यामुळे मी प्रश्न क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**<u>प्रश्न क्रमांक २ बाबत</u> -**

**१८.** एकंदरीत प्रश्न क्रमांक १ वरील कारणमिमांसा व निष्कर्ष बघता अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द ठेवलेले दोषारोप सिध्द केले नसल्याने आरोपीस निर्दोष मुक्त करणे न्यायाचे दृष्टीने योग्य होईल. म्हणुन मी प्रश्न क्रमांक २ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करत आहे.

**- <u>आदेश</u> -**

१. आरोपी नामे **फिरोज पाशा बागवान** यास भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ अन्वयेचे गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. जप्त मुद्देमाल एक ४३ से.मी. लांब व १० से.मी. मुठ आणि एका बाजुस धारदार पाते असलेली एक लोखंडी तलवार अपील कालावधीनंतर योग्य ती विल्हेवाट लावणेकरीता मा. जिल्हाधिकारी, धाराशिव यांचेकडे पाठविणेत यावी.

३. आरोपीने पुर्वी दाखल केलेला जामीनदाराचा मुचलका (जामीन पत्र) व वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिंया संहिता कलम ४३७-अ च्या पुर्ततेकामी रक्कम रू.१५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र सादर करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यांत आला.)

NITIN MAHADEO REDDY
Digitally signed by NITIN MAHADEO REDDY
Date: 2026.07.03 17:37:54 +0530

ठिकाण - कळंब.
दिनांक - ०३/०७/२०२६

**(एन.एम. रेड्डी)**
न्यायदंडाधिकारी, प्र.वर्ग,
कळंब (न्यायालय क्र.२)

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | -- | Shri. Prashant Sunita S. Ovhal, Stenographer (Grade-III) |
| Name of the Court | -- | In the Court of 2nd Jt. Civil Judge, J.D. & J.M.F.C. Kallam. |
| Date of dictation | -- | 03/07/2026. |
| Order signed by the Presiding Officer on | -- | 03/07/2026. |
| Order uploaded on | -- | 03/07/2026. |